**<u>ठळक बातम्या</u>**

- स्वयंपाक आणि वाहनांसाठी गॅस पुरवठ्याला प्राधान्य देण्याचे केंद्र सरकारचे आदेश, घरगुती ग्राहकांना घाबरुन न जाण्याचं पेट्रोलियम मंत्र्यांचं आवाहन
- जलजीवन मिशनला डिसेंबर २०२८ पर्यंत मुदतवाढ देण्याचा केंद्र सरकारचा निर्णय
- सभापती ओम बिर्ला यांच्यावरच्या अविश्वास प्रस्तावावर लोकसभेत चर्चा
- महाराष्ट्राचे २२ वे राज्यपाल म्हणून जिष्णु देव वर्मा यांचा शपथविधी

**आणि**

- अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्यासोबत चर्चा

**<><><><><><>**

पश्चिम आशियातल्या संघर्षामुळे उपलब्ध पुरवठ्याचा वापर करताना स्वयंपाकासाठी सिलिंडर, पाइप गॅस आणि वाहनांसाठीच्या सीएनजीला प्राधान्य देण्याचा आदेश केंद्र सरकारनं जारी केला आहे. साठवणूक आणि काळाबाजार टाळण्यासाठी दोन सिलिंडरमधल्या नोंदणीचा कालावधी २५ दिवसांचा केला आहे. देशातल्या तेल शुद्धिकरण कारखान्यांनी एलपीजी गॅसचं उत्पादन वाढवावं असे आदेश सरकारने दिले आहेत. त्यानंतर खतं, चहा आणि इतर उद्योगांना गॅस पुरवठा केला जाणार आहे. केंद्र सरकारनं नैसर्गिक वायूच्या उत्पादन, पुरवठा, समतोल वितरण आणि उपलब्धतेचे नियमन करण्यासाठी एस्मा अर्थात आवश्यक वस्तू अधिनियम १९५५ लागू केला आहे.

पश्चिम आशियातल्या युद्धाची देशातल्या सामान्य नागरिकांना झळ पोहोचणार नाही याची खबरदारी घ्या असे आदेश प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिले आहेत. अर्थमंत्री निर्मला सीतारामन, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर, पेट्रोलियम मंत्री हरदीप

सिंग पुरी आणि वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांच्या बैठकीत ते बोलत होते असं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

देशात पेट्रोलियम पदार्थांचा कुठलाही तुटवडा नाही. घरगुती ग्राहकांनी घाबरुन जाऊ नये असं आवाहन पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी केलं आहे. विविध देशांकडून आणि विविध मार्गांनी पेट्रोलियम पदार्थांची आयात सुरू आहे. त्यामुळं घरगुती ग्राहकांना गॅस पुरवठा कमी होणार नाही, यासाठी सरकारनं विविध उपाय योजल्याची माहिती त्यांनी दिली. व्यावसायिक वापराच्या सिलिंडरच्या तुटवड्याच्या संदर्भात येणाऱ्या तक्रारींची दखल तेल कंपन्यांच्या कार्यकारी संचालकांची समिती घेईल, असं पेट्रोलियम मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><><><>**

एलपीजी सिलिंडर साठवणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचा इशारा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला आहे. एलपीजीच्या पुरवठ्यामध्ये आलेल्या अडचणींमुळे हॉटेल व्यवसायिक संकटात सापडले आहेत. याप्रकरणी अनेक हॉटेल मालकांनी आज राज्याचे अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांची भेट घेतली. एलपीजी पुरवठ्याच्या प्रश्नावर तोडगा निघाला नाही, तर मुंबईतली हॉटेल्स आणि भोजनालयांना पुढच्या दोन दिवसात कामकाज बंद करावं लागेल असं हॉटेल व्यावसायिकांच्या संघटनेने म्हटलं आहे. पुणे, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, दिल्ली, कर्नाटक, तेलंगणा आणि आंध्रप्रदेशातूनही अशाच प्रकारच्या अडचणी येत असल्याचं फेडरेशन ऑफ हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशन ऑफ इंडियाचे उपाध्यक्ष प्रदीप शेट्टी यांनी म्हटलं आहे.

**<><><><><><>**

केंद्रीय मंत्रीमंडळानं जल जीवन मिशनला डिसेंबर २०२८ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्लीत झालेल्या बैठकीत हा निर्णय झाल्याची माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली.

यासाठी ८ लाख ६९ हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून त्यातला ३ लाख ५९ हजार कोटी रुपयांचा निधी केंद्र सरकार देणार आहे.

शेजारील देशातून येणाऱ्या थेट परकीय गुंतवणुकीसाठीच्या नियमांमध्ये बदल करायला केंद्रीय मंत्रीमंडळानं आज मंजुरी दिली. यामुळं स्टार्टअप आणि नवीन तंत्रज्ञान क्षेत्रातल्या कंपन्यांमध्ये अधिकाधिक गुंतवणूक यायला मदत होईल. या कंपन्यांना आता २ महिन्याच्या आत देशात उत्पादन प्रकल्प उभा करण्यासाठीच्या गुंतवणुकीला मंजुरी मिळेल. कोरोनाच्या काळात परकीय कंपन्यांकडून देशातल्या कंपन्यांचं जबरदस्तीनं अधिग्रहन होऊ नये यासाठी सरकारनं काही निर्बंध लादले होते. तामिळनाडूतल्या मदुराई विमानतळाला आंतरराष्ट्रीय दर्जा देण्याचा निर्णयही केंद्रीय मंत्रीमंडळानं आज घेतला. याशिवाय इतरही काही महत्त्वाचे निर्णय केंद्रीय मंत्रीमंडळाच्या आजच्या बैठकीत झाले. दरम्यान रेल्वे मंत्रालयानं मुंबई - बडोदा दरम्यान १ हजार किलोमीटर ऑप्टिकल फायबर टाकायला मंजुरी दिली. यामुळं अपघातविरोधी कवच तंत्रज्ञान राबवता येणार आहे.

**<><><><><><>**

लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांच्या विरोधातला अविश्वास प्रस्तावावर आज लोकसभेत चर्चा सुरू झाली. काँग्रेसचे खासदार डॉक्टर मोहम्मद जावेद यांनी हा प्रस्ताव मांडला. सभापती बिर्ला यांनी विरोधी पक्षनेत्यांना सभागृहात बोलू दिलं नाही तसंच विरोधी पक्षाच्या महिला खासदारांबाबत असंसदीय वक्तव्य केलं, असा आरोप जावेद यांनी यावेळी केला. सदनाचं कामकाज चालवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या निष्पक्ष दृष्टिकोनाचा अभाव बिर्ला यांच्या वागण्यात दिसून आला, असंही ते म्हणाले.

लोकसभेत या प्रस्तावावर चर्चा करताना संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी या प्रस्ताव आणण्यामागे विरोधी पक्षांचा राजकीय डाव असल्याचा आरोप

केला. सभागृहात सगळे सदस्य समान आहेत आणि कोणालाही सभापतींच्या परवानगीनंच सभागृहात बोलता येतं , असं ते म्हणाले. भाजपाच्या कोणत्याही सदस्यानं कधीही कागद फाडले नाहीत किंवा सभापतींवर फेकले नाहीत, असं त्यांनी सांगितलं. बिर्ला यांच्या कार्यपद्धतीचा त्यांनी गौरवानं उल्लेख केला. बिर्ला यांनी विरोधी पक्षाच्या सदस्यांना नेहमीच जास्त संधी दिली, असंही रिजिजू म्हणाले.

हा प्रस्ताव सभागृहाची प्रतिष्ठा राखण्यासाठी मांडण्यात आला आहे, असं काँग्रेसच्या गौरव गोगोई यांनी चर्चेत बोलताना स्पष्ट केलं. सभापती म्हणजे सरकारचा आवाज नसून संपूर्ण सभागृहाचे हक्क जपणारे रक्षक आहेत, मात्र राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरच्या आभार प्रदर्शनावेळी राहुल गांधी यांच्या भाषणात सभापती बिर्ला यांनी वारंवार व्यत्यय आणला, याची त्यांनी आठवण करून दिली.
विरोधी पक्षाचे सदस्य बोलत असताना ध्वनिक्षेपक वारंवार बंद केले जात होते, असा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार अरविंद सावंत यांनी चर्चेदरम्यान केला.

**<><><><><><>**

देशात समान नागरी कायदा लागू करण्याची वेळ आता आली आहे, असं मत आज सर्वोच्च न्यायालयानं व्यक्त केलं. शरियत कायद्यातल्या तरतुदी मुस्लिम महिलांसाठी भेदभाव निर्माण करणाऱ्या असल्यानं त्या रद्द करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली त्यावेळी सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत यांच्या अध्यक्षतेखालच्या पीठानं हे मत व्यक्त केलं. न्यायालयानं शरियत कायदा रद्द केला तर कायदेशीर पोकळी निर्माण होईल, असं त्यांनी नमूद केलं.

**<><><><><><>**

महाराष्ट्राचे २२ वे राज्यपाल म्हणून जिष्णु देव वर्मा यांचा शपथविधी आज मुंबईत लोकभवनात झाला. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर यांनी त्यांना पदाची शपथ दिली. नवे राज्यपाल जिष्णु देव वर्मा हे साहित्यिक असून, त्यानी पूर्वी त्रिपुरा प्रदेश भाजपाचे सरचिटणीस म्हणून, त्रिपुराचे उपमुख्यमंत्री म्हणून, तसंच तेलंगणाचे राज्यपाल म्हणून काम केलं आहे.

**<><><><><><>**

दोन सत्रातल्या जोरदार घसरणीनंतर देशातल्या शेअर बाजारात आज चांगली तेजी झाली. जागतिक बाजारात झालेली वाढ, घसरलेल्या कच्च्या तेलाच्या किंमती यामुळं ही तेजी दिसून आली. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युद्ध लवकर संपवण्याचे संकेत दिल्याचाही परिणाम बाजारावर झाला. सेन्सेक्स ६४० अंकांनी वधारुन ७८ हजार २०६ अंकांवर बंद झाला. निफ्टी २३४ अंकांची वाढ नोंदवून २४ हजार २६२ अंकांवर बंद झाला. सोनं आणि चांदीच्या किंमतीही आज वधारल्या. सोनं दीड हजार रुपयांनी महाग झाल्यानं एक तोळा २२ कॅरेट सोन्यासाठी १ लाख ६१ हजार रुपये मोजावे लागत होते. चांदी सुमारे ११ हजार रुपयांनी महाग झाल्यानं एक किलो चांदीचे दर २ लाख ७९ हजार रुपयांच्या पलीकडे गेले होते.

**<><><><><><>**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्याशी काल रात्री दूरध्वनीवरुन चर्चा केली. आखाती देशांमधलं युद्ध तसंच रशिया युक्रेन युद्धावर या दोन्ही नेत्यांमध्ये दीर्घ चर्चा झाल्याचं पुतिन यांचे परराष्ट्र धोऱण सल्लागार युरी उशाकोव्ह यांनी सांगितलं. दोन्ही नेत्यांमध्ये या वर्षी पहिल्यांदाच चर्चा झाली आहे. भारत आणि चीनला पेट्रोलियम पदार्थांचा पुरवठा करण्यासाठी रशिया हा भरवाशाचा मित्र आहे. युरोपियन महासंघानं निर्बंध उठवले

तर त्यांनाही पुरवठा सुरू करण्याची रशियाची तयारी असल्याचं वक्तव्य पुतिन यांनी केलं होतं. त्या पार्श्वभूमीवर ही चर्चा झाली.

**<><><><><><>**

प्रसार भारतीनं **पी बी - शब्द** ही सुविधा पुढच्या मार्चपर्यंत मोफत द्यायचा निर्णय घेतला आहे. पी बी शब्द मंचावर दररोज एक हजार बातम्या उपलब्ध केल्या जातात. साठ वृत्तविभाग आणि सुमारे पंधराशे वृत्त प्रतिनिधी यांच्या साहाय्यानं देश विदेशातल्या ताज्या, विश्वासार्ह बातम्या याठिकाणी उपलब्ध होतात.

**//<><><><><><>//**